


दैनिक

# युवावार्ता


परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 51, 900/-
20 कॅरेट मणी = 1, 38, 100/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 24, 280/-
16 कॅरेट मुरणी = 1, 10, 475/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ५५ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार । ०५/०३/२०२६ । पाने - ६




## घुलेवाडी कालव्यात दुर्दैवी मृत्यू

### चिमुकल्याला वाचवतांना आत्यासह दोघेही बुडाले



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - घुलेवाडी परिसरातील माझे घर हौसिंग सोसायटीच्या पाठीमागे असलेल्या निळवंडे कॅनॉलमध्ये मंगळवार दिनांक ३ मार्च रोजी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास हृदयद्रावक घटना घडली. कपडे धुण्यासाठी गेलेल्या चिमुकल्याचा पाय घसरून तो पाण्यात पडला. त्याला वाचवण्यासाठी धाव घेतलेल्या त्याच्या आत्यालाही पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही प्रवाहात वाहून गेले. या दुर्दैवी घटनेत दोघांचाही मृत्यू झाला आहे.

या घटनेत मृत्यू झालेल्या महिलेचे नाव ज्योती प्रकाश आवारी (वय ४०) तर त्यांचा भाचा अथर्व राहुल बागड (वय ९) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घुलेवाडी परिसरातील निडो इंटरनॅशनल स्कूलच्या पाठीमागून निळवंडे कॅनॉल गेलेला आहे. मंगळवारी दुपारी ज्योती आवारी या आपल्या ननंदेसह आणि भाचा अथर्व याच्यासोबत कॅनॉलवर कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. कपडे धुत असताना जवळच खेळत असलेल्या अथर्वचा अचानक पाय घसरला आणि तो कॅनॉलमध्ये कोसळला.

हे पाहताच क्षणाचाही विलंब न करता ज्योती आवारी यांनी त्याला वाचवण्यासाठी पाण्यात उडी घेतली. मात्र कॅनॉलमधील पाण्याचा वेग आणि खोली अधिक असल्याने दोघेही प्रवाहाबरोबर वाहून गेले. मोठ्या प्रयत्नांनंतर दोघांनाही पाण्याबाहेर काढण्यात आले; मात्र दुर्दैवाने तोपर्यंत उशीर झाला होता.

घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. दोघांचेही मृतदेह ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले. रात्री उशिरा शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या घटनेमुळे घुलेवाडी परिसरात मोठी खळबळ उडाली असून संगमनेर व अकोले तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. एका निष्पाप चिमुकल्याचा आणि त्याला वाचवण्यासाठी जीवाची पर्वा न करणाऱ्या मायेच्या आत्याचा अशा दुर्दैवी अपघातात झालेला मृत्यू सर्वांच्या मनाला चटका लावून गेला आहे. या दोघांवर अत्यंत शोकाकुल वातावरणात होळीच्या दिवशीच अंतिम संस्कार करण्यात आले. ऐन सणासुदीच्या दिवशी या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. ज्योती आवारी या काही वर्षापासून आपल्या भावाकडेच राहत होत्या. तर अथर्व हा निडो स्कूलमध्ये इयत्ता दुसरी शिकत होता. या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेचा पुढील तपास महिला पोलीस लता जाधव करीत आहेत. (पान ३ वर)

## पालिकेकडून अतिक्रमण हटाव मोहिम सुरूच



छाया – प्रसाद सुतार, संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपरिषद प्रशासनाने व्यापक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेची सुरुवात करण्यात आली असून कडक परंतु शिस्तीच्या नियमांची अंमलबजावणीनूसार शहरातील नवीन नगर रोड, बसस्थानक परिसर, नवीन अकोले रोडसह महत्त्वाच्या रस्त्यांवरील अतिक्रमणावर पालिकेकडून सोमवारी कारवाई करण्यात आली. ही मोहीम आज बुधवारी देखील सुरू ठेवण्यात आली असून अकोले बायपास रोडवरील वाहतूकीस अडथळा ठरणारे अतिक्रमण पालिकेने पोलीस बंदोबस्तात हटविले जात आहे.

शहर स्वच्छ, सुरक्षित आणि शिस्तबद्ध ठेवण्यासाठी सुज्ञ नागरिकांच्या सहकार्याने पालिकेने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली आहे. नागरिकांनी आपले अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे असे आवाहन पालिकेने केले होते. ज्यांनी या आवाहनाला प्रतिसाद दिला नाही त्यांच्या अतिक्रमणावर पालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या नेतृत्वाखाली, पालिका कर्मचारी व पोलीस बंदोबस्तात नगरपालिकेकडून थेट बुलडोझर चालविण्यात येत आहे.

रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विशेष करून ही कारवाई करण्यात आली. प्रमुख रस्त्यावरील गाळा धारकांनी दुकानासमोर मोठ्या पाट्या, ओटा बांधकाम केले होते. त्यामुळे वाहतूकीला मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण होत होता. अशा दुकानदारांनी दुकानासमोरील वाढीव ओटे, शेड, अनधिकृत फलक नगरपालिकेकडून आता तोडले जात आहे. अकोले बायपास या रस्त्यावर देखील अनेक ठिकाणी व्यावसायिकांनी वाहतुकीला अडथळा होईल असे अतिक्रमण केले आहे. श्रमिक नगर परिसरात तर काही नागरिकांनी थेट रस्त्यावर आपली घरे, दुकाने आणली होती. तर त्यांचा वावर रस्त्यावर होत होता. त्यामुळे पालिकेच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.

नगरपालिकेने शहर स्वच्छ व अतिक्रमणमुक्त करण्यासाठी, वाहतूकीला शिस्त लावण्यासाठी काही कठोर निर्णय घेतले आहेत. त्यानुसार या निर्णयाची अंमलबजावणी सुरू केली आहे. पालिकेने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल असा इशारा देण्यात आला.

## अकोले रस्त्यावरील अरिहंत ऑईल डेपोमध्ये धाडसी चोरी

### २२५ तेलाचे डबे लंपास



संगमनेर- शहरातील अकोले रस्त्यावरील अरिहंत ऑईल डेपो या खाद्यतेलाच्या गोदामावर मंगळवारी (दि. ३) पहाटे धाडसी चोरीची घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी गोदामाचे शटर उचकटून तब्बल २२५ खाद्यतेलाचे डबे पिकअप वाहनातून लंपास केले. या घटनेमुळे व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही घटना पहाटे अंदाजे ३ ते ४.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. चोरट्यांनी प्रथम गोदामाच्या शेजारील मजुरांच्या खोलीला बाहेरून कडी लावून त्यांना आत डांबले. त्यानंतर शटर उचकटून गोदामातील सूर्यफूल व पामतेलाचे सुमारे सव्वादोनशे डबे वाहनात भरून नेले.

चोरीदरम्यान चोरट्यांनी गोदाम व परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे फोडले तसेच डीव्हीआरही सोबत नेला. त्यामुळे तपासात अडचणी निर्माण झाल्या आहेत. काही उपकरणांची मोडतोडही करण्यात आली असल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, उपनिरीक्षक श्रीकांत सावंत व इतर अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले असून ठसे तज्ज्ञांची मदत घेण्यात येत आहे. परिसरातील अन्य सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या घटनेत अंदाजे पाच लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास झाल्याचे सांगण्यात येत आहे. या धाडसी चोरीमुळे शहराबाहेरील गोदामांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून व्यापाऱ्यांनी पोलिसांकडून तातडीने तपास पूर्ण करून आरोपींना अटक करण्याची मागणी केली आहे.

## भाजपकडून आठवले, तावडे यांना राज्यसभेची उमेदवारी

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यसभेसाठी भाजपने यादी जाहीर केली आहे. त्यात महाराष्ट्रातून विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते आणि माया ईवनाते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे.



विधानसभेतील सध्याचे संख्याबळ पाहता, भाजपचे सर्वाधिक ४ उमेदवार निवडून येण्याची शक्यताय. त्यानुसार भाजपने आपली यादी आज जाहीर केली. त्यात विनोद तावडे यांना संधी देण्यात आलीय. त्यामुळे ते पुन्हा एकदा संघटना कामातून मुख्य प्रवाहात आलेत.

संख्याबळानुसार भाजप ४, एकनाथ शिंदेंची शिवसेना १, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस १ आणि महाविकास आघाडीची १ जागा या ठिकाणी निवडून येऊ शकते. संख्याबळानुसार चौथी जागा निवडून आणण्यासाठी भाजपला कसरत करावी लागेल. राज्यातील ७ जागांसाठी प्रत्येकी ३७ मतांचा कोटा निश्चित केला आहे. भाजपला चौथ्या जागेसाठी ३७ मते पूर्ण करताना काही अपक्ष आणि मित्रपक्षांच्या अतिरिक्त मतांची गरज भासेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीच्या गणितात माहीर मानले जातात. यापूर्वीही त्यांनी कमी संख्याबळ असताना उमेदवार निवडून आणून विरोधकांना धक्का दिला. त्यामुळे यावेळीही अपक्ष आमदारांची मदत घेऊन भाजप आपली चौथी जागा सुरक्षित करतील, असे जाणकार सांगता.

## शासकीय वसतिगृहांना महापुरुषांची नावे देण्याचा सामाजिक न्याय विभागाचा निर्णय

मुंबई (वृत्तसंस्था)

सामाजिक न्याय विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांना महापुरुषांची नावे देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ४४९ वसतिगृहांपैकी ४१६ वसतिगृहांच्या नावांना तसेच यापुढे सामाजिक न्याय विभागांतर्गत नव्याने सुरू होणाऱ्या मुलांच्या वसतिगृहांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह आणि मुलींच्या वसतिगृहांना सावित्रिबाई फुले शासकीय वसतिगृह अशी नावे देण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केला आहे. सध्या अनेक वसतिगृहांच्या नावांमध्ये 'मागासवर्गीय' हा शब्द वापरण्यात आला आहे. 'मागासवर्गीय' हा शब्द समाजातील उपेक्षित आणि शोषित घटकांकडे निर्देश करतो व त्यातून विषमता अधोरेखित होते. त्यामुळे संस्थांची ओळख एका विशिष्ट घटकापुरती मर्यादित राहते आणि समाजाचा दृष्टिकोनही त्यानुसार घडतो. ही बाब लक्षात घेऊन वसतिगृहांच्या नावातील 'मागासवर्गीय' हा शब्द वगळून त्यांना महापुरुषांची नावे देण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यात विभागांतर्गत एकूण ४४९ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यामध्ये २३१ मुलांची व २१८ मुलींची वसतिगृहे आहेत. या सर्व वसतिगृहांमध्ये एकूण ४६,६७३ विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामध्ये २४,९५८ मुलांची आणि २१,७१५ मुलींची प्रवेश क्षमता आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी ही योजना राबविण्यात येत असून त्यांना निवास व्यवस्था, नाश्ता, दोन वेळचे जेवण, निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, मुलींसाठी स्वच्छता भत्ता, गणवेश, वैद्यकीय साहित्य, रेनकोट, गमबूट, क्रीडा साहित्य, शैक्षणिक सहली, कार्यशाळा तसेच टीव्ही, अ‍ॅक्वागार्ड, वॉटर कुलर आणि फायर फायटिंग यांसारख्या सुविधा पुरविण्यात येतात.







## संगमनेरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त तुळजाभवानी मातेचा भव्य देखावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संपूर्ण जगाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने संगमनेर स्वाभिमानी शहर व तालुका शिव जन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने आई तुळजाभवानीच्या भव्य देखाव्याचे उद्घाटन गुरुवार दिनांक ५ मार्च २०२६ रोजी सायं. ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा येथे आयोजित करण्यात आला आहे.



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे स्वाभिमानी संगमनेर तालुका शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने यावर्षी भव्य देखाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा येथे गुरुवारी ५ मार्च रोजी सायं. ६ वाजता या देखाव्याचे उद्घाटन माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. (पान ३ वर)

# इराणचा कडवा प्रतिकार; दुबई, दोहा अन् अबुधाबी पुन्हा स्फोटांनी हादरले

पश्चिम आशियात सुरू असलेल्या लष्करी तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणमध्ये अणुकिरणोत्सर्गचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर दुसरीकडे इराणकडून अद्यापही जोरदार प्रत्युत्तर सुरूच असल्याचे चित्र आहे. परिणामी मध्यपूर्वेत तणाव दिवसागणिक वाढत आहे. अमेरिका आणि इस्त्रायली लष्करी कारवाईला प्रत्युत्तर म्हणून इराणने सलग चौथ्या दिवशी दुबई, दोहा आणि अबुधाबीवर क्षेपणास्त्र हल्ले केलेत, ज्यामुळे हे देश हादरले आहेत. यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रतिक्रिया दिली असून ट्रम्प यांनी सांगितले की पूर्वी लक्ष्य केलेल्या देशांचे इराणशी तुलनेने तटस्थ संबंध होते.



मध्यपूर्वेतील परिस्थिती सतत बिघडत चालली आहे आणि अधिकाधिक तणावपूर्ण बनत आहे. अमेरिका-इस्त्रायली हल्ल्यानंतर, इराणने दुबई, दोहा आणि अबुधाबीवर आणखी एक क्षेपणास्त्र हल्ला केला, ज्यामुळे हे देश हादरले. दरम्यान, इराणमधील एका शाळेत अमेरिका आणि इस्त्रायली हल्ल्यात मृतांची संख्या ७८७ वर पोहोचली आहे.

दरम्यान, याबद्दल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, शेजारील देशांवर इराणचे प्रत्युत्तरात्मक हल्ले अनेकांसाठी अनपेक्षित होते, अगदी त्यांच्यासाठीही. ट्रम्प म्हणाले की पूर्वी लक्ष्य केलेल्या देशांचे इराणशी तुलनेने तटस्थ संबंध होते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संघर्षग्रस्त भागात अमेरिका सैन्य तैनात करेल की नाही यावर स्पष्ट उत्तर दिले नाही. त्यांनी सांगितले की वॉशिंग्टन दीर्घकालीन मोहिमेसाठी तयार आहे. जरी इराणने स्पष्ट केले आहे की ते दबावापुढे झुकणार नाहीत, तरी ते वाटाघाटीसाठी खुले आहे.तेहरानने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याची घोषणा देखील केली आहे आणि इशारा दिला आहे की या धोरणात्मक सागरी मार्गावरून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही जहाजाला आग लावली जाईल. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी असेही म्हटले आहे की अमेरिका-इस्त्रायली हल्ल्यांपूर्वी मध्य पूर्वेत राहणाऱ्या अमेरिकन लोकांना बाहेर काढण्याची कोणतीही पूर्व योजना नव्हती.

त्यांनी असा युक्तिवाद केला की ऑपरेशन इतक्या वेगाने पुढे गेले की बाहेर काढण्याची व्यवस्था करणे अशक्य होते. ट्रम्प म्हणाले, कारण हे सर्व इतक्या लवकर घडले. या प्रदेशात अडकलेल्या अमेरिकन लोकांबद्दल विचारले असता, त्यांनी सांगितले की त्यांना वाटते की इराण इस्त्रायल आणि इतर देशांवर हल्ला करण्याची तयारी करत आहे, त्यामुळे त्वरित कारवाईची आवश्यकता आहे.

# जाहिरातीतून एसटी कमविणार २५० कोटी



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणारी 'लालपरी' आता केवळ प्रवाशांनाच नव्हे, तर महसूलवाढीलाही वेग देणार आहे. पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून एसटी महामंडळाला तब्बल २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या ३१० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहा.कामगार आयुक्त पल्लवी सहारे, तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाची २५१ आगारे आणि ६१० पेक्षा अधिक लहान-मोठी बसस्थानके राज्यभर पसरलेली आहेत. सुमारे १२ हजार बसेसच्या ताफ्याद्वारे दररोज ५० ते ५५ लाख प्रवाशांची ने-आण केली जाते. भविष्यात बससंख्या वाढल्यानंतर ही दैनंदिन प्रवासी संख्या १ कोटींपर्यंत जाईल. अशा व्यापक पोहोच असलेल्या माध्यमावर जाहिरात देणे म्हणजे उत्पादकांसाठी सुवर्णसंधीच आहे. चांद्यापासून बांदयापर्यंत, गावखेड्यांपासून महानगरांपर्यंत पोहोचणाऱ्या एसटीच्या प्रत्येक चाकासोबत आता महसुलाची नवी चक्रेही फिरणार आहेत. बसस्थानके, त्यांचा परिसर, बसेसच्या आतील व बाहेरील भाग तसेच उपलब्ध सर्व संसाधनांचा पुरेपुर वापर करून जाहिरात महसूल वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्यात आला आहे.

# नगर- मनमाड महामार्गावर चार हजार किलो मांगुर मासे जप्त


युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अवैध व्यवसायांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा व शिर्डी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत नगर-मनमाड महामार्गावरील निमगाव बायपास चौक येथे ४ हजार किलो प्रतिबंधित मांगुर (क्लॅरियस) मासा जप्त केला. या कारवाईत सुमारे २९ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गुप्त माहितीवरून सापळा रचून पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पथक शिर्डी पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेत होते. दरम्यान, ट्रक क्रमांक डब्लू बी २५ एम ५०२३ मध्ये केंद्र सरकारने प्रतिबंधित केलेले मांगुर मासे भरून नगर-मनमाड हायवेने जाणार असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळाली.

त्यानुसार शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे व पोलीस उपनिरीक्षक सागर काळे यांच्या सहकार्याने निमगाव बायपास रोडवर सापळा रचण्यात आला. संशयित ट्रक ताब्यात घेऊन तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित मांगुर मासे आढळून आले.





ट्रकमधील चार इसमांना ताब्यात घेण्यात आले असून ते सर्व पश्चिम बंगाल राज्यातील रहिवासी असल्याची माहिती आहे. प्राथमिक चौकशीत सदर मासे पश्चिम बंगाल येथून भरून खोपोली (मुंबई) येथे विक्रीसाठी नेत असल्याचे त्यांनी कबूल केले.

ट्रक शिर्डी पोलीस ठाण्यात आणून मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी सौ. प्रतिक्षा सुधाकर पाटेकर यांना बोलावण्यात आले. त्यांनी तपासणी करून जप्त केलेला मासा हा प्रतिबंधित मांगुर असल्याचा अधिकृत अभिप्राय दिला.

अंदाजे ४ लाख रुपये किमतीचे ४ हजार किलो प्रतिबंधित मांगुर मासे, अंदाजे २५ लाख रुपये किमतीचा ट्रक असा एकूण २९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेले मासे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यात आले आहेत.

याप्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १६०/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३, २७५, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शिर्डी पोलीस करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व शिर्डी पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्तरित्या पार पाडली.

# राज्यातील पशुवैद्यकीय सेवा ठप्प होण्याची भीती

## १० मार्चला सामूहिक राजीनामे ?



मुंबई

महाराष्ट्र राज्यातील शासकीय पशुवैद्यकीय सेवा आता एका अभूतपूर्व संकटाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आक्रमक झालेल्या सुमारे अडीच हजार शासकीय पशुवैद्यकीय अधिकारी आणि चार हजार पशुधन पर्यवेक्षकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या १० मार्च रोजी हे सर्व ६,५०० कर्मचारी सामूहिक राजीनामे देण्याच्या तयारीत असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. राज्य सरकारने त्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत हा टोकाचा निर्णय घेण्याचा निर्धार या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

जर या कर्मचाऱ्यांनी आपला निर्णय मागे घेतला नाही, तर ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय व्यवस्थेचा कणाच मोडून पडेल. राज्यातील हजारो शासकीय पशुवैद्यकीय दवाखाने आणि उपकेंद्रांमधील सेवा पूर्णपणे ठप्प होण्याची भीती आहे. १० मार्चपूर्वी या संपावर किंवा राजीनाम्यांच्या सत्रावर काही तोडगा निघणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आम्ही केवळ न्याय्य हक्कासाठी हा लढा देत आहोत, अशी भूमिका कर्मचाऱ्यांच्या संघटनेने घेतली आहे. महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटनेने आता पशुसंवर्धन विभागाच्या धोरणांविरोधात राज्यव्यापी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. राज्याच्या पशुसंवर्धन विभागात सध्या मनुष्यबळाचा मोठा तुटवडा असून, केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतपत कर्मचाऱ्यांवर संपूर्ण यंत्रणेचा डोलारा रेटला जात असल्याचा गंभीर आरोप संघटनेने केला आहे. सध्याच्या परिस्थितीत, एका पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडे अनेक गावांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या अपुऱ्या मनुष्यबळामुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवा देताना डॉक्टरांची मोठी ओढाताण होत आहे. पशुवैद्यक आधीच प्रशासकीय आणि क्लिनिकल कामाच्या ओझ्याखाली दबलेले आहेत. त्यातच, शासनाकडून कोणत्याही अतिरिक्त सुविधा किंवा मनुष्यबळ न देता, या डॉक्टरांकडून रात्री उशिरापर्यंत तातडीची सेवा देण्याची सक्ती केली जात आहे.

# भारताचे हवाई सुरक्षा कवच अधिक मजबूत

## पाच एस -४०० खरेदीला मंजुरी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

मध्य-पूर्व आशियात सध्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि 'कामिकाझे' ड्रोनचा वापर करून युद्ध पेटलेले असताना, भारताने आपल्या हवाई संरक्षणाला अधिक अभेद्य करण्याचा निर्णय घेतला आहे. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण खरेदी मंडळाने रशियाकडून आणखी पाच एस-४०० एअर डिफेन्स सिस्टिम खरेदी करण्याच्या भारतीय हवाई दलाच्या प्रस्तावाला सोमवारी मंजुरी दिली. या निर्णयामुळे भारताच्या सीमांवरील हवाई सुरक्षा कवच अधिक मजबूत होणार असून, शत्रूच्या कोणत्याही आकाशातील हालचालीला चोख प्रत्युत्तर देणे शक्य होणार आहे. डीपीबी कडून मंजुरी मिळाल्यानंतर आता हा प्रस्ताव संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण संपादन परिषदेकडे गरजेची स्वीकृती मिळवण्यासाठी पाठवला जाईल. डीएसी ने या प्रस्तावाला संमती दिल्यानंतर, नवीन प्रणालींची किंमत निश्चित करण्यासाठी एक खर्च वाटाघाटी समिती स्थापन केली जाईल. या प्रक्रियेचा अंतिम टप्पा म्हणजे वित्त मंत्रालयामार्फत पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटी कडे हा विषय जाईल. सीसीएस कडून अंतिम मंजुरी मिळाल्यानंतरच रशियासोबत प्रत्यक्ष खरेदीचा करार पूर्ण होईल. सध्या जागतिक स्तरावर,



विशेषतः आखाती देशांमध्ये ज्या प्रकारे ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले वाढत आहेत, ते पाहता एस-४०० सारखी प्रगत यंत्रणा भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. एस -४०० ही जगातील सर्वात प्रभावी हवाई संरक्षण प्रणालींपैकी एक मानली जाते, जी ४०० किलोमीटरपर्यंतच्या अंतरावरील शत्रूची विमाने, क्षेपणास्त्रे आणि ड्रोन शोधून नष्ट करण्यास सक्षम आहे. भारताकडे आधीच या प्रणालीच्या काही तुकड्या तैनात आहेत, मात्र नव्या पाच प्रणालींच्या समावेशामुळे देशाच्या उत्तर आणि पश्चिम सीमांवरील सुरक्षा अधिक कडेकोट होईल.

# सायलेंट को-वर्किंग स्पेस : एकाग्रतेसाठीची आधुनिक कार्यसंस्कृती

कोरोनानंतरच्या काळात जगभरात काम करण्याच्या पद्धतीत मोठा बदल झाला. एकेकाळी सकाळी ठराविक वेळी कार्यालयात हजेरी लावणे हीच कामाची परंपरा होती; मात्र लॉकडाऊनच्या काळात 'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना सर्वसामान्य झाली. सुरुवातीला घरातून काम करण्याचा अनुभव अनेकांना सुखद वाटला, परंतु कालांतराने घरातील गोंधळ, लक्ष विचलित करणारे वातावरण, अपुरी जागा आणि एकटेपणाची भावना या अडचणी प्रकर्षाने जाणवू लागल्या. दुसरीकडे पूर्णवेळ कार्यालयात परत जाणेही अनेकांना मान्य नव्हते. या दोन टोकांच्या दरम्यान संतुलित पर्याय म्हणून को-वर्किंग स्पेसची लोकप्रियता वाढली; आणि त्याच प्रवाहातून आता 'सायलेंट को-वर्किंग स्पेस' हा नवा ट्रेंड झपाट्याने पुढे येत आहे.

पारंपरिक को-वर्किंग स्पेसची कल्पना म्हणजे गजबजलेले वातावरण, स्टार्टअप्सची चहलपहल, नेटवर्किंग इव्हेंट्स, कॉफी मशीनभोवती चर्चा आणि सर्जनशील संवाद. परंतु प्रत्येकाला असे वातावरण प्रेरक वाटेलच असे नाही. काही जणांना संवादापेक्षा एकाग्रता महत्त्वाची वाटते. विशेषतः फ्रीलान्सर, लेखक, ग्राफिक डिझायनर, सॉफ्टवेअर अभियंते, डेटा विश्लेषक, संशोधक, तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी यांना शांत, व्यत्ययमुक्त जागेची गरज असते. याच गरजेतून सायलेंट को-वर्किंग स्पेसची संकल्पना आकाराला आली.

सायलेंट को-वर्किंग स्पेस म्हणजे कार्यालय आणि वाचनालय यांचा संगम. येथे स्पष्ट नियम असतात- मोबाइल सायलेंट मोडवर ठेवणे, मोठ्याने फोन कॉल न करणे, अनावश्यक चर्चा टाळणे, हेडफोनशिवाय ऑडिओ न ऐकणे. काही ठिकाणी 'नो कॉल झोन' आणि 'डिस्कशन रूम' असे वेगळे विभाग असतात. मुख्य कामाच्या जागेत पूर्ण शांतता राखली जाते, तर चर्चा किंवा ऑनलाइन मिटिंगसाठी स्वतंत्र केबिन्स दिल्या जातात. आरामदायी खुर्च्या, वैयक्तिक डेस्क, उत्तम प्रकाशयोजना, वेगवान इंटरनेट, चार्जिंग पॉइंट्स आणि मूलभूत सुविधा-यावर भर दिला जातो.




### सायलेंट को-वर्किंग स्पेस म्हणजे काय?

**सायलेंट को-वर्किंग स्पेस म्हणजे पूर्ण शांतता, एकाग्रता आणि व्यत्ययमुक्त वातावरणात काम करण्यासाठी तयार केलेली सामायिक कार्यजागा. ही पारंपरिक को-वर्किंग स्पेसपेक्षा वेगळी असते, कारण येथे गप्पा, मोठ्याने फोन कॉल किंवा सततची हालचाल यांना मर्यादा असतात.**

**ही संकल्पना कार्यालय आणि वाचनालय यांच्या मिश्रणासारखी आहे. येथे काम करणाऱ्या सर्वांनी काही स्पष्ट नियम पाळायचे असतात – मोबाईल सायलेंट मोडवर ठेवणे, मोठ्याने बोलणे टाळणे, हेडफोनशिवाय ऑडिओ न वापरणे आणि आवश्यक चर्चा स्वतंत्र केबिनमध्ये करणे. मुख्य कामाच्या जागेत पूर्ण शांतता राखली जाते.**

भारतामध्ये महानगरांत या ट्रेंडची सुरुवात वेगाने झाली. विशेषतः Bengaluru, Mumbai, Pune Am{U Hyderabad येथे आयटी, स्टार्टअप्स आणि फ्रीलान्स संस्कृती मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे अशा स्पेसची मागणी वाढली आहे. जागतिक स्तरावर WeWork सारख्या कंपन्यांनी को-वर्किंग मॉडेल लोकप्रिय केले; आता त्याच संकल्पनेचे अधिक शिस्तबद्ध आणि शांत रूप स्थानिक उद्योजक सादर करत आहेत.

सायलेंट को-वर्किंग स्पेसचा सर्वात मोठा फायदा म्हणजे उत्पादकतेत होणारी वाढ. घरात काम करताना टीव्ही, घरातील सदस्यांची ये-जा, घरकामाची जबाबदारी किंवा सोशल मीडियाचे आकर्षण यामुळे कामावर लक्ष केंद्रित करणे कठीण जाते. परंतु शांत आणि व्यावसायिक वातावरणात बसल्यावर मन आपोआप कामाच्या मोडमध्ये जाते. मानसशास्त्रीय दृष्टीने पाहता, 'सोशल प्रेझेन्स'-म्हणजे इतर लोक काम करत असल्याची जाणीव-ही स्वतःलाही काम करण्यास प्रवृत्त करते. गोंगाट नसला तरी आसपासची कामाची शिस्त प्रेरणा देते.

याशिवाय, सायलेंट को-वर्किंग स्पेस मानसिक आरोग्यासाठीही उपयुक्त ठरू शकते. पूर्णपणे घरात एकटे बसून काम करताना अनेकांना एकाकीपणाची भावना जाणवते. कार्यालयीन गडबडीतून दूर राहायचे असते, पण पूर्ण एकटेपणाही नको असतो. सायलेंट स्पेसमध्ये संवाद मर्यादित असला तरी माणसे आजूबाजूला असतात. त्यामुळे सामाजिक संपर्काची किमान गरज पूर्ण होते, पण एकाग्रतेत व्यत्यय येत नाही.आर्थिक दृष्टिकोनातूनही हा मॉडेल महत्त्वाचा आहे. अनेक स्टार्टअप्स किंवा फ्रीलान्सरना स्वतंत्र कार्यालय घेणे परवडत नाही. सायलेंट को-वर्किंग स्पेसमध्ये दिवस, आठवडा किंवा महिन्याच्या आधारावर जागा भाड्याने मिळते. त्यामुळे खर्च नियंत्रित राहतो. मोठ्या शहरांमध्ये वाढत्या भाडे दरांच्या पार्श्वभूमीवर हा पर्याय अधिक सोयीस्कर वाटतो. हा ट्रेंड केवळ महानगरापुरता मर्यादित राहिलेला नाही. डिजिटल कामाची संधी वाढल्यामुळे अनेक तरुण मूळ गावी राहूनच ऑनलाइन सेवा देत आहेत. डिजिटल मार्केटिंग, कंटेंट क्रिएशन, ऑनलाइन ट्युशन, अकाउंटिंग, ई-कॉमर्स व्यवस्थापन अशा क्षेत्रांत काम करणाऱ्यांना शांत आणि व्यावसायिक जागेची गरज भासते. अर्धशहरी शहरांमध्ये लहान प्रमाणावर सायलेंट को-वर्किंग स्पेस सुरू करण्याची मोठी संधी आहे. संगमनेर, नाशिक, अहिल्यानगरसारख्या शहरांतही भविष्यात या मॉडेलला मागणी निर्माण होऊ शकते.

तथापि, या संकल्पनेसमोर काही मर्यादा आहेत. पूर्ण शांततेचा आग्रह सर्वांना रुचेलच असे नाही. काही क्षेत्रांमध्ये संवाद आणि तत्काळ चर्चा आवश्यक असते. अशा वेळी सायलेंट स्पेस उपयुक्त ठरत नाही. तसेच भाडे दर मध्यमवर्गीयांसाठी कधी कधी जास्त वाटू शकतात. नेटवर्किंगच्या संधी पारंपरिक को-वर्किंगपेक्षा कमी असू शकतात. मात्र ज्यांना खोलवर एकाग्रतेने काम करायचे आहे, त्यांच्यासाठी ही जागा अधिक योग्य ठरते. कामाच्या बदलत्या संस्कृतीत 'फ्लेक्सिबिलिटी' हा कळीचा शब्द ठरत आहे. कर्मचारी आणि स्वतंत्र व्यावसायिक दोघांनाही वेळ, जागा आणि कामाच्या पद्धतीबाबत स्वातंत्र्य हवे आहे. सायलेंट को-वर्किंग स्पेस हे त्या स्वातंत्र्याचे संतुलित रूप आहे. येथे ना घराचा गोंधळ, ना पारंपरिक कार्यालयाची कडक बंधने-तर एक शिस्तबद्ध, शांत आणि व्यावसायिक वातावरण.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि
उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



## साहित्य कला मंचातर्फे आदर्श वाचनालय सन्मान पुरस्काराचे आयोजन

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर येथील साहित्य कला मंचातर्फे वाचन चळवळीला प्रोत्साहन देणाऱ्या सार्वजनिक वाचनालयाचा सन्मान सोहळा गुरुवार दि. ५ मार्च २०२६ रोजी व्यापारी असोसिएशन सभागृहात दुपारी ४ ते ६ या वेळेत संगमनेर नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा मैथिली तांबे यांच्या शुभहस्ते होत असल्याची माहिती साहित्य कला मंचाचे संस्थापक संजय नवले व अध्यक्ष सुनिता घुले यांनी दिली आहे.

या सन्मान सोहळ्यात मंचाचे कायदेशीर सल्लागार ॲड. सुभाष गोडगे यांच्या 'झाकाळल्या नभात' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन होणार आहे. त्याचप्रमाणे दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या ऑनलाईन काव्यस्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन कारभारी देव्हारे, नितीन वाकचौरे, अनिल चांडक, दर्शन जोशी, अकबर शेख, विजय पाटील, सागर पन्हाळे, प्रतिमा काळे, नम्रता दिघे, अर्चना ठुबे आदिंनी केले आहे.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एमबीए व अध्यापक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर संचलित मातोश्री ललितादेवी मालपाणी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एम.बी.ए. इन्स्टिट्यूट व मातोश्री इंदिराबाई रतिलाल गांधी अध्यापक विद्यालयाचा संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी मान्यवर उपस्थित असताना प्रसिद्ध संमोहन तज्ञ डॉ. जगदीश राठोड यांच्या हस्ते विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. व्यासपीठावर व्यवस्थापन समितीचे ज्येष्ठ सदस्य अरुण ताजणे, प्राचार्य डॉ. भावे भालचंद्र, डॉ. किरण गोंटे, डॉ. ज्योती मेस्त्री, प्राचार्या डॉ. सविता घुले, प्रा. प्रणित धिवर, प्रा. प्रतिमा गाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात तीनही महाविद्यालयांच्या वार्षिक अहवाल वाचनाने झाली. त्यानंतर गुणदर्शन स्पर्धांमध्ये नृत्य, मुकअभिनय, समूह नृत्य, आदिवासी नृत्य, रेट्रो सादरीकरण तसेच व्यक्तीगत गीतगायन आदी प्रकारांद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची अप्रतिम छटा सादर केली. स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

डॉ. राठोड यांनी संमोहन कलेची प्रभावी प्रात्यक्षिके सादर करून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले तसेच मन:व्यवस्थापन आणि व्यक्तिमत्त्व विकासात संमोहन कलेचे सकारात्मक महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. भावे यांनी संमोहनाच्या प्राचीन परंपरेवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमास डॉ. राजू शेख, प्रा. मंगला आरोटे, प्रा. नयना पंजे, प्रा. कविता काटे, प्रा. संजय खेमनर, प्रा. संतोष खामकर, प्रा. नेहा शहा, प्रा. महेश पावडे, प्रा. वैशाली नवले, प्रा. सिमा कासार, प्रा. चंद्रकला सापनर, ग्रंथपाल कोमल महांकळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. कविता भोकनल व प्रा. विद्या भवर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्या डॉ. सविता घुले यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साह, जल्लोष आणि सांस्कृतिक वैभवाने परिपूर्ण ठरला.

# आमदार चषकात एम.एस.के. प्रथम, वीरभद्र द्वितीय

## मेंगाळवाडी क्रिकेट स्पर्धेत ६४ संघांचा उत्स्फूर्त सहभाग

**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
संगमनेर तालुक्यातील मेंगाळवाडी येथे वीरभद्र क्रिकेट क्लब यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक क्रिकेट स्पर्धेत नारायणगाव येथील एम.एस.के. क्रिकेट संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर मेंगाळवाडीच्या वीरभद्र क्रिकेट क्लबने द्वितीय क्रमांक मिळवला.

या स्पर्धेचे आयोजन वीरभद्र क्रिकेट क्लब, मेंगाळवाडी; वाघोबा इलेव्हन मेंगाळवाडी; आदिवासी इलेव्हन मेंगाळवाडी; जानूआई माता क्रिकेट क्लब, तमाकडवाडी; विरभद्र देवस्थान ट्रस्ट, मेंगाळवाडी तसेच समस्त ग्रामस्थ सावरचोळ (मेंगाळवाडी) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या क्रिकेट स्पर्धेत एकूण ६४ संघांनी सहभाग घेतला होता.

विजेत्या संघांना आमदार अमोल खताळ, सेवानिवृत्त प्राचार्य टी. एन. कानवडे, सावरचोळच्या सरपंच अनिता कानवडे, कामगार पोलीस पाटील संजय कानवडे, निमजच्या सरपंच अलका मेंगाळ, माजी जि.प. सदस्य भोरू भूतांबरे, भाजप उपाध्यक्ष अशोक कानवडे, भागवत कानवडे, भूषण शेटे, रामदास कानवडे, प्रशांत कानवडे, रामभाऊ राहणे, आशिष कानवडे, देविदास मेंगाळ, सतीश गोपाळे, नाजुका गांडाळ व अलका मेंगाळ आदी मान्यवरांच्या हस्ते आमदार चषक व रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी सागर कानवडे, पोपट मेंगाळ, पोपट गांडाळ, विजय मेंगाळ, विजय भूतांबरे, राम डोखे आणि अनिल भूतांबरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



विजेते संघ पुढील प्रमाणे.
प्रथम - नारायणगाव एम.एस.के. क्रिकेट संघ. द्वितीय - वीरभद्र क्रिकेट क्लब, मेंगाळवाडी. तृतीय - साई इलेव्हन, चंदनापुरी. चतुर्थ - कळवन्तीदरा. पंचम - सतीचीवाडी. षष्ठ - आर.सी.बी. इलेव्हन, शिनोली. सप्तम - डोंगरगाव इलेव्हन, अकोले. अष्टम - खानापूर इलेव्हन, अकोले.

पान नं. ०१ वरुन...

## संगमनेरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज...

यावेळी आमदार सत्यजित तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्यासह संगमनेर शहरातील विविध मान्यवर व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. महाराजांचा पुतळा येथे आई तुळजाभवानी यांचा भव्य देखावा उभारण्यात आला आहे. आकर्षक विद्युत रोषणाई सजावट आणि प्रसन्न मूर्ती असलेला हा देखावा नागरिकांसाठी तीन दिवस दर्शनासाठी खुला राहणार आहे.

देखाव्याचे उद्घाटन झाल्यानंतर याचबरोबर या जयंती उत्सवात किल्ले शिवनेरी येथील महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले ढोल ताशा पथक, युवकांसाठी डीजे, शिवकालीन मर्दानी खेळ, एलईडी लाईट शो, फटाक्यांची आतिषबाजी व फ्लावर्स ब्लास्टर्स यांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा संगमनेर शहराच्या मध्यवर्ती असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या जवळ होणार असून अत्यंत संस्मरणीय ठरणार आहे.

तालुका व शहरातील तमाम नागरिक बंधू-भगिनी व शिवप्रेमींनी या शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आई तुळजाभवानीच्या भव्य देखावा उद्घाटन कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वाभिमानी संगमनेर शहर व तालुका शिवजन्मोत्सव समिती यांच्या वतीने करण्यात आले आह

## गोखले शिक्षण संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात कला व क्रीडा महोत्सव



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**
गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर येथे दिनांक २० ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कला व क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास दौंडकर यांच्या अध्यक्षतेखाली विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संतोष साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली धावणे, कबड्डी, खो-खो तसेच इतर क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा पार पडल्या. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले.

तसेच सांस्कृतिक विभागाच्या प्रा. उर्मिला वाव्हळ व प्रा. राजश्री पंडित यांच्या आयोजनाखाली गायन, नृत्य, वक्तृत्व, रांगोळी, पाककला आदी विविध सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळाल्याने वातावरण आनंदमय झाले.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजना करिता प्रा. घाडगे एस.बी., डॉ. पीठे ए.डी., प्रा. सुनील देसले, प्रा. चावंडे अमोल यांनी परीक्षक म्हणून कार्य केले. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री अमोदकर, श्री शृंगारे, श्री ढेपले, श्री कांबळे, श्री शिंदे, श्री निसाळ यांनी विशेष सहकार्य केले.

प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष बी.एड चे सर्व विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले. नवप्रशिक्षित विद्यार्थी शिक्षकांना स्पर्धा आयोजनाचा अनुभव मिळाला. याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास दौंडकर यांनी यशस्वी नियोजनाकरिता सर्वांचे आभार व्यक्त केले व या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण व आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## घुलेवाडी कालव्यात...(पान नं. ०१ वरुन)

पान १ वरुन
दरम्यान या दुर्घटनेत दोन जणांचा बळी गेला आहे. त्यामुळे त्या परिवारावर मोठा आघात झाला आहे. भविष्यात देखील अशी घटना घडू नये म्हणून जलसंपदा विभागाने या निळवंडे पाटाला दोनी बाजूने बेरीकेट लावावे, तसेच पाटाला कपड़े धुण्यासाठी महिलानी जाऊ नये, यासाठी सुचना फलक लावावेत किंवा तशी व्यवस्था करावी. त्याचबरोबर मृत्यु पावलेल्या व्यक्तीच्या परिवारास शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागनी सामाजिक कार्यकर्ते सतीश खरात यानी केली आहे.

# संगमनेरमध्ये छ. शिवाजी महाराजांचे अश्वरुढ स्मारकच !



संगमनेर शहराच्या अस्मितेचा आणि अभिमानाचा विषय असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अखेर साकार रूप धारण करत आहे. बसस्थानकासमोरील मध्यवर्ती ठिकाणी उभारण्यात येणारे हे स्मारक 'अश्वरूढ' स्वरूपातच उभे राहणार आहे, ही बाब आता स्पष्ट झाली आहे. मात्र या ऐतिहासिक निर्णयानंतर काही मंडळी अचानक पुढे येऊन श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र दिसत आहे. हे वास्तव जनतेसमोर मांडणे आवश्यक आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे दैवत आहेत. त्यांचे स्मारक उभारणे हा भावनेचा विषय असला, तरी त्यामागे प्रशासनिक प्रक्रिया, निधीची उपलब्धता, शासकीय परवानग्या आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा या सर्व बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात. या सर्व प्रक्रिया पूर्ण करून स्मारकाच्या कामाला प्रत्यक्ष गती देण्याचे कार्य विद्यमान आमदार मा. अमोल खताळ यांनी केले आहे, हे संगमनेरकर जनतेला चांगले ठाऊक आहे.

स्मारक उभारणीसाठी केवळ घोषणा करून चालत नाही. त्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा, संबंधित विभागांशी समन्वय, जागेची निश्चिती, आराखडा मंजुरी आणि निधीची तरतूद करावी लागते. या प्रत्येक टप्प्यावर आमदार अमोल खताळ यांनी वैयक्तिक लक्ष घालून काम पुढे नेले. प्रशासनाशी सातत्याने बैठक, अधिकाऱ्यांशी चर्चा आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, यामुळेच आज हा प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला आहे.

काही जण केवळ फोटोसेशन किंवा निवेदनांपुरते मर्यादित राहिले, परंतु प्रत्यक्ष फाइल हलवण्याचे, मंजुरी मिळवण्याचे आणि निर्णय घेण्याचे काम आमदारांनीच केले. जनतेने हे सत्य लक्षात ठेवले पाहिजे.

स्मारकाच्या स्वरूपाबाबत लोकांचे मत जाणून घेण्याची प्रक्रिया राबवण्यात आली, हे लोकशाहीचे स्वागतार्ह पाऊल आहे. मात्र अश्वरूढ स्वरूपाबाबत जनतेमध्ये आधीपासूनच स्पष्ट भावना होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे तेज, पराक्रम आणि स्वराज्याची उभारणी यांचे प्रतीक म्हणून अश्वरूढ मूर्तीच योग्य असल्याची भूमिका जनतेने ठामपणे मांडली.

ही भावना ओळखून आणि तिचा सन्मान करून अश्वरूढ स्मारकाच्या निर्णयाला बळ देण्याचे कार्य आमदार अमोल खताळ यांनी केले. त्यामुळे हा निर्णय केवळ योगायोग नसून, नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिणाम आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे, प्रकल्प यशस्वी होऊ लागला की काही जण अचानक पुढे येतात आणि हे आम्ही केले, असे सांगू लागतात. जेव्हा प्रश्न होते, अडचणी होत्या, मंजुरी प्रलंबित होती, तेव्हा ही मंडळी कुठे होती? आणि आज काम प्रत्यक्ष सुरू होण्याच्या मार्गावर आले असताना श्रेय घेण्यासाठी पुढे येणे हे जनतेची दिशाभूल करण्यासारखे आहे.

शिवरायांच्या नावावर राजकारण करणे चुकीचे आहे. स्मारक हा अभिमानाचा विषय आहे; तो राजकीय स्टंटबाजीचा विषय नाही. ज्यांनी प्रत्यक्ष परिश्रम घेतले, त्यांनाच योग्य श्रेय मिळाले पाहिजे.

स्मारक उभारणीसोबतच संगमनेरमध्ये इतर विकासकामांनाही गती मिळाली आहे. रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक सुविधा आणि विविध शासकीय योजनांमध्ये सातत्याने काम होत आहे. स्मारक उभारणी हा त्याच व्यापक विकासदृष्टीचा एक भाग आहे. शहराच्या सांस्कृतिक ओळखीला बळ देणारे हे स्मारक भविष्यात पर्यटन आणि स्थानिक अभिमानाचे केंद्र ठरेल.

संगमनेरकर जनतेने अफवा आणि खोट्या दाव्यांपासून सावध राहावे. सोशल मीडियावर किंवा विविध व्यासपीठांवरून चुकीची माहिती पसरवली जात असेल, तर तिची शहानिशा करावी. सत्य स्पष्ट आहे - अश्वरूढ स्मारकाच्या उभारणीसाठी निर्णायक भूमिका आणि अंतिम पुढाकार विद्यमान आमदार अमोल खताळ यांचाच आहे.

आपण सर्वांनी एकत्र येऊन या ऐतिहासिक क्षणाचे स्वागत करूया. शिवरायांचे स्मारक हे आपले सामूहिक स्वप्न आहे, आणि ते साकार करण्यासाठी ज्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले, त्यांना योग्य मान्यता देणे ही जनतेची जबाबदारी आहे. होय, अश्वरूढच स्मारक होणार - आणि त्याचे श्रेय खऱ्या अर्थाने काम करणाऱ्यांनाच मिळाले पाहिजे. संगमनेरच्या अस्मितेचा हा विजय आहे.

**- शिवप्रेमी राहुल सोमवंशी**

## सावरगाव तळ प्रवराचे राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत १४ विद्यार्थी उत्तीर्ण



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ येथील प्रवरा शिक्षण संस्थेचे प्रवरा माध्यमिक विद्यालयातील १४ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एन.एम.एम.एस.) मध्ये उत्तीर्ण होऊन शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपल्या गावाचा ठसा उमटविला आहे.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक एम एम एन एस ही शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा व शैक्षणिक गुणवत्तेचा कस पाहणारी महत्त्वाची परीक्षा मानली जाते. या परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि शिक्षक मार्गदर्शनाच्या बळावर हे यश मिळविले आहे. एन.एम.एम.एस. या राज्यस्तरीय स्पर्धात्मक परीक्षेत विद्यालयातील रागिनी गणेश खैरे, साहिल अशोक नेहे, सानिका राजेंद्र गुळवे, ऐश्वर्या शिवाजी शेळके, जीवन रामनाथ गुळवे, अजय अनिल गांडाळ, अक्षदा गोरक्षनाथ थिटमे, अंतरा संतोष वाघमारे, प्राची सतीश वाल्हेकर, आराध्या राहुल नेहे, सृष्टी प्रविण नेहे, ऋतिका बाबासाहेब नेहे, युवराज सुधाकर नेहे आणि सुयोग राजेंद्र नेहे यांचा समावेश आहे.

विद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन, सराव चाचण्या व वैयक्तिक लक्ष देऊन त्या विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली गेली. त्यामुळेच हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. त्यांच्या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे तसेच पालकांचे अभिनंदन होत आहे. विद्यालयाच्या या यशामुळे सावरगाव तळ आणि तालुक्याच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून भविष्यात ही असेच यश संपादन करण्याचा विद्यालयाने निर्धार करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# संपादकीय...

## महाराष्ट्रातील मनुष्य -वन्यजीव संघर्षाचे वास्तव

महाराष्ट्रासह देशातील महानगरांचा झपाट्याने होणारा विस्तार हा केवळ विकासाचा निदर्शक नसून पर्यावरणीय संतुलनासाठी मोठे आव्हान ठरत आहे. शहरांच्या सीमेबाहेर अनियंत्रित पद्धतीने वाढणाऱ्या वसाहती, महामार्ग, औद्योगिक क्षेत्रे आणि गृहनिर्माण प्रकल्प यांमुळे नैसर्गिक संरक्षक पट्टे झपाट्याने नष्ट होत आहेत. हे पट्टे केवळ पूर, उष्णतेच्या लाटा किंवा इतर नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण करत नाहीत, तर वन्यजीव आणि मानवी वस्त्या यांच्यात आवश्यक अंतर राखतात. मुंबई महानगर प्रदेशातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतची वाढती लोकवस्ती हे याचे ठळक उदाहरण आहे. महाराष्ट्रात २०२२ च्या आकडेवारीनुसार १,९८५ बिबटे नोंदले गेले असून राज्य देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सुमारे ५४ बिबट्यांची वस्ती असून प्रति १०० चौ.कि.मी. सुमारे २६ बिबट्यांची घनता आढळते. मात्र हे बिबटे उद्यानापुरते मर्यादित राहत नाहीत. जीपीएस-सक्षम कॅमेरा ट्रॅप्स आणि रेडिओ कॉलरमधील माहितीवरून ते नियमितपणे बफर झोनमध्ये आणि लोकवस्तीच्या सीमेलगत फिरताना दिसतात. परिणामी, माणूस-प्राणी संघर्षाच्या घटना वाढताना दिसत आहेत. अलीकडे राज्य सरकारकडून प्रत्येक जिल्ह्यात दाट लोकवस्तीला लागून असलेल्या जंगलांमध्ये एक कोटी रुपयांच्या बकऱ्या सोडण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. या बकऱ्या बिबट्यांसाठी 'पुरेसे भक्ष्य' ठरतील आणि त्यामुळे ते शहरांकडे वळणार नाहीत, असा यामागील युक्तिवाद आहे. त्याचबरोबर वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत बिबट्यांना अनुसूची १ मधून अनुसूची २ मध्ये खाली आणण्याची मागणीही करण्यात आली आहे, ज्यामुळे त्यांचे कायदेशीर संरक्षण कमी होईल. मात्र तज्ज्ञांच्या मते हा दृष्टिकोन समस्येच्या मूळ कारणांपासून दूर नेणारा आहे. अभ्यास दर्शवितो की बिबट्यांच्या एकूण आहारातील सुमारे ८० टक्के अन्न ते जंगलातच मिळवतात. भटकी कुत्री त्यांच्या आहारात जवळपास ४० टक्के वाटा उचलतात, तर उर्वरित भागात लहान वन्य प्राणी आणि उंदीर यांचा समावेश होतो. म्हणजेच अन्नटंचाईपेक्षा शहर आणि जंगल यांच्यातील वाढती जवळीक हे संघर्षाचे मुख्य कारण आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मांसाहारी प्राण्यांना कृत्रिमरीत्या अन्न पुरवठा करणे टाळावे, कारण त्यामुळे प्राण्यांना माणसांच्या उपस्थितीची सवय लागते. अशी 'हॅबिच्युएशन' निर्माण झाल्यास जनावरांवर किंवा माणसांवर हल्ल्यांची शक्यता वाढू शकते. शिवाय, मोठ्या प्रमाणावर बकऱ्या जंगलात सोडल्यास त्या मानवी वस्त्यांच्या सीमेलगतच एकत्र जमण्याची शक्यता असते. त्यामुळे बिबटे उलटपक्षी अधिक जवळ येऊ शकतात. पाळीव जनावरांमधून वन्यजीवांकडे ब्रुसेलोसिस किंवा फूट-अँड-माउथ डिसीजसारखे आजार पसरण्याचा धोका असतो. परिसंस्थांमध्ये हजारो वर्षांत विकसित झालेला नैसर्गिक समतोल अशा हस्तक्षेपांमुळे बिघडू शकतो. नैतिकदृष्ट्याही पाळीव प्राण्यांना भक्ष्य म्हणून वापरण्याच्या कल्पनेला समाजात विरोध होण्याची शक्यता आहे. बिबट्यांचे संरक्षण कमी करण्याचा प्रस्तावही धोकादायक ठरू शकतो. अनुसूची १ मधील प्राण्यांना कडक कायदेशीर संरक्षण असते. ते कमी केल्यास पकडणे, स्थलांतर किंवा ठार करणे सोपे होईल. परंतु संशोधन दर्शविते की अंधाधुंद स्थलांतर केल्यास बिबटे अनेकदा २५ दिवसांच्या आत मूळ ठिकाणी परत येतात आणि २५० कि.मी.पेक्षा जास्त अंतर पार करतात. अशा हालचालींमुळे नव्या भागांत संघर्ष निर्माण होऊ शकतो. संघर्षाचे खरे कारण म्हणजे अनियंत्रित शहरी विस्तार. घनकचरा व्यवस्थापनातील त्रुटी, जंगलालगत वाढणाऱ्या अनौपचारिक वसाहती, अपुरा प्रकाश आणि अव्यवस्थित नियोजन यामुळे भटकी प्राण्यांची संख्या वाढते आणि शिकारी प्राणी त्यांच्यामागे येतात. त्यामुळे उपायही शहरी नियोजनातच शोधावे लागतील. २००३ ते २०१५ दरम्यान संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाने वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने संशोधनाधारित धोरण राबवले होते. यात पकडणे टाळून आपत्कालीन पथकांचे प्रशिक्षण, रात्रीची गस्त, वैज्ञानिक निरीक्षण आणि स्थानिक समुदायांशी संवाद यावर भर देण्यात आला. त्यातून प्राणघातक घटनांमध्ये घट झाली होती. हे उदाहरण दीर्घकालीन उपाययोजनांचे महत्त्व अधोरेखित करते. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिकसारख्या शहरांसमोर उभे असलेले हे आव्हान देशव्यापी आहे.

## पोदार प्रेप मध्ये 'सायन्स म्युझियम' थीमॅटिक टूर; चिमुकल्यांनी अनुभवले विज्ञानाचे चमत्कार



संगमनेर :

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी आणि कल्पकता वाढवण्यासाठी पोदार प्रेप संगमनेर येथिल प्री-प्रायमरी विद्यार्थ्यांनकरिता 'थीमॅटिक टूर - सायन्स म्युझियम' हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. चिमुकल्या विद्यार्थ्यांना विज्ञानातील विविध पैलूंची ओळख करून देणे आणि त्यांच्यातील कुतूहल जागृत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या उपक्रमांतर्गत शाळेत विज्ञानाचे एक छोटेखानी संग्रहालय उभारण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी 'ज्वालामुखीचा उद्रेक' कसा होतो, याचे प्रात्यक्षिक पाहिले. तसेच प्राचीन काळातील महाकाय 'डायनासोर' आणि त्यांच्या 'जीवाश्मांची' प्रतिकृती पाहून मुले थक्क झाली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना लाखो वर्षांपूर्वीच्या पृथ्वीवरील जीवसृष्टीची रंजक माहिती मिळाली.

या उपक्रमात ज्वालामुखी आणि डायनासोर आकर्षणाचे केंद्र ठरले. या कार्यक्रमात 'ज्वालामुखीचा उद्रेक' दर्शवणारी प्रतिकृती होती. बेकिंग सोडा आणि व्हिनेगरच्या मदतीने निर्माण केलेली ही प्रतिकृती पाहून मुले थक्क झाली. यासोबतच प्राचीन काळातील महाकाय 'डायनासोर' आणि त्यांच्या 'जीवाश्मांची' (फॉसिल्स) माहिती देणारे विशेष दालन उभारण्यात आले होते. डायनासोरचे अवशेष कसे सापडतात आणि ते कसे जतन केले जातात, हे मुलांनी मोठ्या आवडीने जाणून घेतले.

केवळ पुस्तकी ज्ञान न देता, प्रत्यक्ष अनुभवातून हसत-खेळत शिक्षण देण्यासाठी विविध 'सायन्स प्रयोगांचे' आयोजन करण्यात आले होते. हवेचा दाब, पाण्याचे गुणधर्म आणि रासायनिक अभिक्रिया अशा क्लिष्ट संकल्पना शिक्षकांनी प्रयोगांच्या माध्यमातून सोप्या करून सांगितल्या.

या विशेष दौऱ्यात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध साध्या, पण रंजक प्रयोगांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. विज्ञानातील मूलभूत संकल्पना हसत-खेळत समजून घेताना मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. हा संपूर्ण उपक्रम पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या मीनाक्षी मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. अशा उपक्रमामुळे मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्यास मदत होते व त्यांच्या ज्ञानात भर पडते, असेही त्यांनी सांगितले.

मुलांच्या बालपणातच त्यांच्यात शोधक वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हा या थीमॅटिक टूरचा मुख्य उद्देश आहे, असे मत यावेळी पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका सोनल शुक्ला यांनी व्यक्त केले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी पोदार प्रेपच्या सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले आणि पालकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. शाळेच्या या कल्पक उपक्रमाचे पालकांनी भरभरून कौतुक केले. मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी अशा प्रकारच्या 'थीमॅटिक टूर' अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

### तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहमगदनगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५१५/२०२६ दिनांक - २५/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मुस्ताक गुलाबभाई तांबोळी, रा. अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०३/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. करुले, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे पत्नी नामे यास्मिन बाबू तांबोळी, यांचा जन्म मौजे करुले, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०८/०६/१९७४ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी करुले यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी करुले यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

### तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहमगदनगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५०२/२०२६ दिनांक - २५/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. साईराज संजय बोप्पा, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक १३/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे आई नामे मीरा संजय बोप्पा यांचा मृत्यू मौजे संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ३०/०३/२०२२ रोजी झाला असून त्यांची मृत्यू नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**
नामांकित साऊथ इंडीयन कॅफेसाठी
कॅशियर | हेल्पर
साऊथ इंडीयन कुक
१ ते २ वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक
संगमनेर
9518722868

**पाहिजेत**
अकाऊंटट - २ जागा ( टॅली कोर्स )
ड्रायव्हर - ३ जागा
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
9370071717
9822791484

**पाहिजेत**
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

**पाहिजेत**
होलसेल दुकानासाठी मुले/ मुली पाहिजेत
अनुभवास प्राधान्य
हेल्पर - २
सेल्समन - २
7020585298
9422905155

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**
सिध्दार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
घरकाम करणारी महिला- १ (सर्व घरकाम)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

**पाहिजेत** सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन - २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता- प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

**पाहिजेत** कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
RMO डॉक्टर्स - (MBBS,BAMS, BHMS) सकाळ -२ , दुपार-२ सायंकाळ -२
नर्स - (BSC GNM) सकाळ -२, दुपार-२ सायंकाळ -२
सिस्टर इनचार्ज- Bsc Nursing/MBA
डाटा ऐंट्री ऑपरेटर MJPJAY जागा -२
क्लेम डॉक्टर - MJPJAY / Mediclaim जागा - ०२
रिसेप्शन - महिला/पुरुष जागा - ०२
वॉर्ड मॅनेजर जागा - ०१
8888882225 9766855593

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SAKIB MOHAMMEDJABIR HUSAIN SIDDIKI
TO NEW NAME AS
SAKIB MOHAMMAD JABIR HUSSAIN SIDDIKI
ADD -JUNA JORVE ROAD, MADINA NAGAR, TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR,422605

**पाहिजेत**
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

**बौद्ध वधू पाहिजे**
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

**सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत**
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

**ड्रायव्हर पाहिजे**
घरगुती ऑटोमॅटिक गाडीवर निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**WE ARE HIRING**
JOIN OUR TEAM
CorelDRAW Ps Ai Id
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
MUNAVVAR CHAND BAGAWAN
TO NEW NAME AS
MUNAVVAR FIROZ BAGWAN
ADD - LAL BAVATA, MOMINPURA, SANGAMNER, TAL - SANGAMNER , DIST - AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SADIK ALI PIRMAHAMAD SHAIKH
TO NEW NAME AS
SADIK PIRMAHAMAD SHAIKH
ADD - AT POST KURAN, TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
FAROJ SALIM SHAIKH
TO NEW NAME AS
FIROZ SALIM BAGWAN
ADD - OPP LAL BAVATA OFFICE, MOMINPURA, SANGAMNER, TAL - SANGAMNER , DIST - AHMEDNAGAR

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

**ड्रायव्हर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977






MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था
सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२
सेल्यमन - ०२
ड्रायव्हर - ०२
दुकान काम व शोरुमसाठी - ०२ जागा
महिला कामगार - ०२
9822097904



दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४



वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# कवि वसेकर मातृगौरव पुरस्काराने सन्मानित



**पुणे**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
परभणी येथील मूळ रहिवासी व सध्या पुण्यात स्थायिक असलेले बीएसएनएलचे सेवानिवृत्त लेखाधिकारी तथा लोकप्रिय शीघ्रकवी-लेखक गिरीश वसेकर यांना तितिक्षा इंटरनॅशनल, पुणे संस्थेच्या वतीने 'तितिक्षा मातृगौरव (स्व. ताई घाणेकर स्मृती) पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान सदाशिव पेठ, पुणे येथील अक्षरवेल सभागृहात ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय साहित्यिक डॉ. मधुसूदन घाणेकर यांच्या हस्ते देण्यात आला. कार्यक्रमास संस्थापिका-अध्यक्षा प्रिया दामले, ज्येष्ठ साहित्यिक श्री मुर्केवार, मंदाताई नाईक, डॉ. आम्रपाली, नाट्य-टीव्ही अभिनेते निलेश दातार व कवी विजय सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

दूरसंचार विभागात कार्यरत असताना उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांना 'संचार सारथी' पुरस्कार व सुवर्णपदक प्राप्त झाले होते. जानेवारी २०२० मध्ये बीएसएनएलमधून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी साहित्य क्षेत्रात सक्रिय योगदान दिले. कोरोना काळात ५०० हून अधिक कविता व विविध विषयांवरील लेखन करून त्यांनी विशेष लोकप्रियता मिळवली.

त्यांचे 'चाफा' (२०२३) व 'आमोद' (२०२४) हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून, 'पापा' (किशोर लेखसंग्रह) व 'टांग टिंग टिंगा' (बालकाव्यसंग्रह) ही पुस्तके ऑक्टोबर २०२५ मध्ये प्रकाशित झाली आहेत. पहिली आवृत्ती संपून दुसऱ्या आवृत्तीची मागणी वाढत आहे. विविध संस्थांकडून उत्कृष्ट साहित्यिक व कवी म्हणून त्यांचा गौरव झाला आहे. मानाचा तितिक्षा मातृगौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# अंभोरे येथील २० आदिवासी बांधवांचा शिवसेनेत प्रवेश

## आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश सोहळा



**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
संगमनेर तालुक्यातील अंभोरे येथे महायुतीचे नेते सुरजित खेमनर, संतोष बलसाने आणि मंजाबापू साळवे यांच्या पुढाकारातून आदिवासी समाजातील सुमारे वीस बांधवांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा उत्साहात पार पडला.

शिवसेनेत प्रवेश केलेल्यांमध्ये रामनाथ बर्डे, पोपट बर्डे, विष्णू बर्डे, मंगेश बर्डे, अर्जुन बर्डे, सुनील पवार, शिवाजी पवार, आशा पवार, संदीप बर्डे, लक्ष्मण जाधव, अर्चना बर्डे, शिवाजी मोरे, सलमान बर्डे, अनिता मोरे, सुरेखा बर्डे, कोंडाजी जाधव, पोपट जाधव आदींचा समावेश आहे. सर्वांनी शिवसेनेचा झेंडा हाती घेत पक्षाशी निष्ठा व्यक्त केली. यावेळी नवप्रवेशित तरुणांनी सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत या भागात शिवसेनेची ताकद वाढवून आमदार खताळ यांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. आदिवासी समाजाच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करू.

यावेळी बोलताना आमदार अमोल खताळ म्हणाले की, आदिवासी समाजाचे जे-जे प्रश्न प्रलंबित असतील, ते महायुतीच्या माध्यमातून शंभर टक्के सोडवण्याचा आमचा प्रयत्न राहील. शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

अंभोरे येथील जवळपास वीस आदिवासी बांधवांनी आज शिवसेनेत प्रवेश करून आमच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. पक्षात त्यांना योग्य तो मान-सन्मान आणि संधी दिली जाईल. त्यांच्या कोणत्याही अडीअडचणी सोडवण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू. जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून त्यांच्या समस्या तातडीने मार्गी लावल्या जातील. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही ठोस पावले उचलणार आहोत.

- आ. अमोल खताळ

# सह्याद्री जुनियर कॉलेजमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रश्नमंजुषा व व्याख्यानमाला



**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री जुनियर कॉलेज, संगमनेर येथील विज्ञान विभागाच्या वतीने प्रश्नमंजुषा स्पर्धा व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध वैज्ञानिक प्रा. लक्ष्मण घायवट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जुनिअर कॉलेजचे प्राचार्य खेमनर एस. एम. अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून तसेच सी. व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रा. सुरेश घोरपडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. यामध्ये त्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगांचा आढावा घेतला.

सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयात वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रा. लक्ष्मण घायवट यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विज्ञानाच्या विविध अंगांचा ऊहापोह केला. विज्ञानाची प्रगती ही मुख्यतः त्यागातूनच झाली आहे, असा ठाम विचार त्यांनी मांडला. आपण ज्या गोष्टींचा विचार करतो, त्यावर हजारो किलोमीटर दूर आधीच तंत्रज्ञान विकसित झालेले असते, ही आपली शोकांतिका असल्याचे त्यांनी नमूद केले. शत्रूपासून संरक्षणासाठी आपण राफेल विमाने आणतो; मात्र त्यांची पूजा लिंबू-मिरची बांधून करतो, ही विसंगती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आज विज्ञानवाद रुजवणे हेच मोठे आव्हान आहे, असेही त्यांनी सांगितले. अंधश्रद्धा आणि पाप-पुण्याच्या संकल्पनांमुळे समाजाची प्रगती खुंटते, असे प्रतिपादन करून विद्यार्थ्यांनी मनगट आणि मेंदू या दोन्हींचा योग्य वापर करून पुढे जावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य एस. एम. खेमनर यांनी विज्ञान दिनाविषयी माहिती दिली. १९२८ साली रामन परिणामाचा शोध लागला; मात्र भारतात राष्ट्रीय विज्ञान दिन १९८७ पासून साजरा केला जाऊ लागला. त्या वेळी राजीव गांधी पंतप्रधान असताना त्यांचे वैज्ञानिक सल्लागार वसंतराव गोवारीकर यांच्या शिफारशीनुसार हा राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा होऊ लागला, अशी माहिती त्यांनी दिली. रूढी-परंपरांपासून सुरक्षित अंतर ठेवून विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रथम क्रमांक - सिद्धांत सतीश शेळके; द्वितीय क्रमांक - वरपे ईश्वर राजेंद्र, आंबरे रोशन जालिंदर; तृतीय क्रमांक - उदय भाऊराव वामन, अथर्व दत्तू कडलग आणि निखिल बाबासाहेब चत्तर यांनी पटकावला. बक्षीस वितरणानंतर आदर्श पिंगळे या विद्यार्थ्याने मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे माजी प्राचार्य ओझा, उपप्राचार्य एस. पी. सुरसे, सुपरवायझर एस. बी. कुटे, प्रा. सुरेश घोरपडे व इतर शिक्षक उपस्थित होते. प्रा. अजित गडाख यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. रोझा देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. नितीन नवले, गवारे, देशमुख, हासे, राऊत, भारत शिंदे व इतर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबाबत जागरूकता निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# पत्रकारिता बावचळली की चळली...

## सोशल मीडिया युगातील पत्रकारिता ; वेग की विवेकाचा मृत्यू?

### पत्रकारिता न्यायालय नाही; ती तथ्यांची वाहक !



आज पत्रकारितेचा सर्वात मोठा शत्रू जर कोणी असेल तर तो केवळ सत्ता नाही तर सोशल मीडिया आहे. वेगाच्या या युगात बातमी तपासण्याआधीच व्हायरल केली जाते. ब्रेकिंग हा शब्द इतका स्वस्त झाला आहे की प्रत्येक व्हायरल आता सत्य वाटू लागलं. यातून बातमीचा विध्वंस होतो, जिवंत राहते फक्त हेडलाईन.

पूर्वी बातमी तयार करण्यासाठी शोध, पडताळणी आणि अभ्यास लागत होता. आज मात्र मोबाईल कॅमेरा, एक स्टेटस आणि काही गोड-गोड शब्द पुरेसे झाले आहेत. पत्रकारिता आता अनेक ठिकाणी रिपोर्टिंगपेक्षा पोस्टिंग झाली आहे. आणि पोस्टिंगचा धर्म वेगळा असतो. लाइक्स, शेअर्स आणि कमेंट्स.

सोशल मीडियाने पत्रकारितेला नवा आवाज दिला हे मान्य. पण त्याच वेळी जबाबदारीची शिस्त ढासळली. कुठलीही घटना घडली की लगेच निष्कर्ष. गुन्हेगार ठरवला जातो, निर्दोष ठरवला जातो, न्यायालयाची गरजही राहत नाही. ही धोकादायक प्रवृत्ती आहे. कारण पत्रकारिता न्यायालय नाही; ती तथ्यांची वाहक आहे. आज अनेकांना वाटतं की जास्त फॉलोअर्स म्हणजे प्रभावी पत्रकारिता. पण फॉलोअर्सचा आकडा हा सत्याचा मापदंड नाही. आवाज मोठा असणं म्हणजे सत्य मोठं असणं नाही. उलट, कधी कधी मोठा आवाज म्हणजे रिकामेपणाचा गोंगाट असतो.

पत्रकारितेच्या क्षेत्रात सर्वदूर ही प्रवृत्ती दिसत आहे. काही जण बातमीपेक्षा ब्रँडिंगवर जास्त लक्ष देतात. मी कुठे आहे? मी कुणासोबत आहे? यावर जास्त भर असतो. पण मी काय लिहितो? यावर कमी. सोशल मीडियाने एक नवी समस्या निर्माण केली आहे. मत आणि बातमी यातील सीमारेषा धूसर झाली आहे. वैयक्तिक मताला बातमीचा दर्जा दिला जातो. विश्लेषणाच्या नावाखाली पूर्वग्रह मांडले जातात. आणि मग समाजात विभागणी वाढते.

पत्रकारितेने लक्षात ठेवायला हवं, वेग महत्त्वाचा आहे, पण विवेक त्याहून जास्त महत्त्वाचा आहे. कारण वेगात दिलेली चुकीची माहिती समाजात भीती, गैरसमज आणि तणाव निर्माण करू शकते. बावचळलेली पत्रकारिता आता केवळ सत्ता किंवा पैशामुळेच नाही; तर तंत्रज्ञानाच्या आक्रमणामुळेही अडचणीत आली आहे. पण तंत्रज्ञान शत्रू नाही. त्याचा वापर कसा करतो यावर सगळं अवलंबून आहे.

* पत्रकारिता व्हायरल होण्यासाठी आहे की सत्य सांगण्यासाठी?
* लाइक्स मिळवण्यासाठी आहे की विश्वास जिंकण्यासाठी?
* हा प्रश्न सध्या तीव्रतेने भेडसावतो आहे
* कारण इतिहास लाइक्स मोजत नाही.तो विश्वास मोजतो.
* आणि विश्वास गमावलेली पत्रकारिता फक्त आवाज असते प्रभाव नसतो.

**- मोहिनी प्रभा**

# युद्ध, जननी आणि जन्मभूमी ...



आम्ही आबूधाबीला एका वैवाहिक कार्यक्रमासाठी आलो होतो आणि इराक-इस्त्राइल युद्धामुळे येथेच अडकून पडलो. अरब अमिरातीतली सर्व विमानतळे ठप्प झाली आणि सर्वच विमान उड्डाणे रद्द झाली. आम्ही ज्या अमिरात पॅलेस मधे थांबलेलो होतो, तेथील व्यवस्थापनाने आम्हाला कळवले की, तुम्ही आमच्या देशाचे पाहुणे आहात. आमची विमानसेवा सुरळीत होत नाही तोपर्यंत तुम्हाला याच हॉटेलमध्ये ठेवावे, असा सरकारी आदेश आम्हाला आलाय. या देशातील सर्वच हॉटेल्समध्ये देशात अडकलेल्या पाहुण्यांची निवास व भोजन व्यवस्था सरकारने केली आहे. तुम्ही निश्चिंतपणे येथे राहू शकता. युद्धात अडकलेले असतांना हा एक सुखद आश्चर्याचा धक्का होता.

रात्री आम्हा सर्वांच्या मोबाईलमधे कर्कश आवाजात २-३ वेळा अलर्ट मेसेज सरकारकडून आला. रात्री बाहेर न पडण्याची व खिडक्यांचे परदे लावण्याची सूचना या मेसेजमधे होती. स्वाभाविकपणे आम्ही परद्याआडून आकाशाकडे परत परत पहात होतो. पण एकही क्षेपणास्त्र आम्हाला दिसले नाही. दिवसभरात लष्करी विमानांचा आवाजही आला नाही. नाही म्हणायला, एक-दोन नागरी विमान आकाशात दिसले. रस्त्यांवरील गाड्यांचे आवागमन मात्र नेहेमीसारखेच होते.

दुस-या दिवशी नाश्ता करुन आम्ही हॉटेलच्या बाहेर आलो व टॅक्सी बुक केली. क्षणात टॅक्सी हजर झाली. आम्ही आबुधाबीचा राजवाडा व इतर काही प्रसिद्ध ठिकाणे पाहून आलो. स्वामीनारायण मंदीर सोडले, तर सर्व प्रेक्षणीय स्थळे उघडी होती. बाजार व मॉल्स पण उघडे होते. युद्धजन्य परीस्थितीचा मागमूसही नव्हता. सर्वत्र रमजानच्या सजावटीचा झगमगाट होता.

भारतातून मात्र सारखे फोन येत होते. आम्ही सुरक्षित आहोत का, याची विचारणा होत होती. कधी फोन न करणाऱ्यांचे फोन व मेसेज पाहून मलाच माझी काळजी वाटू लागली. आपण फारच मोठ्या संकटात अडकलोय की काय, हे पहायला मी रुम मधला टीव्ही चालू केला. भारतातील टीव्ही वाहिण्यांवर या युद्धाचे इतके भयंकर कव्हरेज सुरु होते, की जणू आपल्यावरच बॉंब पडताहेत असे वाटावे. मधेच ब्रेकिंग न्यूजचा भोंगा वाजवून जुन्याच बातम्या परत परत दाखवल्या जात होत्या. बाहेर शांतता होती, पण टीव्हीवरचा हलकल्लोळ पहातांना आपल्यावरच फायटर जेटमधून गोळे पडताहेत असे वाटत होते. कारण नसतांना बीपी वाढत होता. टीव्ही बंद केला आणि मला युद्ध थांबल्यासारखे वाटू लागले.

माझी वृद्ध आई मात्र प्रचंड काळजीत होती. तिची चिंता कमी व्हावी म्हणून मी तिला व्हिडिओ कॉल केला. आम्ही सर्व मजेत हॉटेलमधल्या चकचकित भांड्यात जेवण करतोय, हे पाहून तिचाही जीव भांड्यात पडला. पण शेवटी आई ती आईच घरी पोहोचणार नाही तोपर्यंत ती चिंता करत रहाणार टीव्ही पहात रहाणार टीव्हीवरचा बॉंब वर्षाव झेलत रहाणार!!

इराण विरुद्ध अमेरिका व इस्त्राएलचे युद्ध भडकलेले आहे. इराणवर महाशक्ती अमेरिका प्रचंड आक्रमण करते आहे. प्रत्युत्तरादाखल सीमित युद्धसामग्री असतांना इराण विविध देशातील अमेरिकेच्या तळांवर क्षेपणास्त्रांनी हल्ला करत आहे. इराणकडून येणाऱ्या या क्षेपणास्त्रांना आकाशातच निष्प्रभ करण्याचा प्रयत्न आखाती देश करत आहेत. या निष्प्रभ क्षेपणास्त्रांचे जळते अवशेष पडल्यामुळे काही इमारतींना आग लागली. या आगीचे दृश्य पुन्हा पुन्हा दाखवून वाहिण्या आपला टीआरपी वाढवत होत्या आणि देशातील परिजनांचे ब्लडप्रेशर विनाकारण वाढत होते.

दोनच दिवसात विमानसेवेची सुरवात झाली. आम्हाला मुंबई ऐवजी हैद्राबादचे विमान घ्यावे लागले. खरं तर अजूनही २-३ दिवस अमराती सरकारचे पाहुणे म्हणून त्या आलीशान पॅलेस मधे सुरक्षित राहता आले असते. पण 'अपि स्वर्णमयी लंका न मे लक्ष्मण रोचते, जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसि' या श्रीरामोक्तिची प्रचिती आली. माता आणि मातृभूमीची ओढ काय असते, याचा अनुभव घेत मी मायदेशी परतत होतो.

**– डॉ. संजय मालपाणी, संगमनेर**

# डॉ. इथापे फार्मसी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**संगमनेर**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
डॉ. इथापे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व वामनराव इथापे डी. फार्मसी कॉलेज, संगमनेर येथे दिनांक २८ फेब्रुवारी रोजी माजी विद्यार्थी मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा देत माजी विद्यार्थी भावूक झाले आणि आनंदमय वातावरणात स्नेहसंमेलनाचा आनंद लुटला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वामन आर. एल., डॉ. जगनर ए. बी., प्रा. खताळ एम. बी. व प्रा. गीते डी. यू. उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, माजी विद्यार्थी हे कोणत्याही महाविद्यालयाचे प्रेरणास्थान व कणा असतात. त्यांच्या यशामुळेच संस्थेची ओळख अधिक बळकट होते.


कार्यक्रमाची प्रस्तावना प्राचार्य डॉ. उर्मिलेश झा यांनी केली. त्यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत माजी विद्यार्थ्यांचे योगदान अधोरेखित केले. यानंतर अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत महाविद्यालयीन जीवनातील अनुभव कथन केले. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, आपुलकी व स्नेह यांचे वातावरण अनुभवायला मिळाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रकटे यांनी केले, तर उपस्थित मान्यवर व माजी विद्यार्थ्यांचे आभार पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. नवले यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. मनसुख, प्रा. जाधव, प्रा. वाघमोडे, प्रा. नवले, प्रा. शिरतार, प्रा. पानसरे, प्रा. तांबोळी, प्रा. जाधव, प्रा. गोसावी, प्रा. बिबवे, प्रा. हासे, प्रा. नाईकवाडी, प्रा. देशमुख, हासे, आव्हाड, वर्पे, दातीर, गुंजाळ, सांगळे, बोऱ्हाडे, शहा व धात्रक यांनी विशेष परिश्रम घेतले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक इथापे व कार्यकारी संचालक अनिकेत इथापे यांनी सर्वांचे आभार मानत भविष्यातही अशा प्रकारचे स्नेहमेळावे आयोजित करण्यात येतील, असे सांगितले. कार्यक्रमामुळे माजी विद्यार्थी आणि संस्थेतील नाते अधिक दृढ झाले असून, भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

READ E- NEWS ON Yuvavarta.in


Happy Birthday



मा.श्री.बाळासाहेब देशमाने
- संचालक -
स्वदेश उद्योग समूह



मा. श्री. महेश मयूर
- संचालक -
ओम मयूर ज्वेलर्स, संगमनेर
संचालक - सुवर्ण नागरी सह पतसंस्था



अमर कतारी
शिवसेना (उबाठा) माजी शहरप्रमुख

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरु होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे





नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ........ 05
सेल्सगर्ल........ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर.......... 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त संगमनेर दुमदुमणार

## भव्य शिवजन्मोत्सव सोहळा व ऐतिहासिक मिरवणूक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - हिंदू समाज व शिवसेना-भाजपा महायुती, संगमनेर यांच्यावतीने शुक्रवार दिनांक ६ मार्च रोजी दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीनिमित्त संपूर्ण शहरातून दिमाखदार मिरवणूक काढण्यात येणार असून शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भव्य मिरवणुकीची सुरुवात संगमनेर नगरपरिषद येथून होणार आहे. त्यानंतर मिरवणूक लालबहादूर शास्त्री चौक, बाजारपेठ, तेली खुंट, सय्यद बाबा चौक, मेन रोड, चावडी, अशोक चौक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मार्गे पुढे जात बसस्थानक येथे सांगता होणार आहे. संपूर्ण मार्गावर ठिकठिकाणी स्वागत कमानी, फुलांची सजावट आणि शिवमय वातावरणाची निर्मिती करण्यात येणार आहे.

मिरवणुकीत विविध पारंपरिक व ऐतिहासिक देखावे सादर केले जाणार असून त्यामध्ये सनई-चौघडे, शिवछत्रपती गौरव पालखी, अश्वदर्शन, हिंदू जनजागृती घोष पथक, मर्दानी खेळ, तसेच आदि योगी महादेव यांचा देखावा यांचा समावेश असणार आहे. याशिवाय अफजलखान वधाचा जिवंत देखावा विशेष आकर्षण ठरणार असून अघोरींचा देखावा, किंग स्टार ब्रास बँड पथक (मावळ) आणि एकलव्य ढोल-ताशा पथक यांच्या दमदार सादरीकरणामुळे वातावरण शिवमय होणार आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात संपूर्ण संगमनेर दुमदुमून जाणार आहे.

शिवसेना-भाजपा महायुतीच्या वतीने संगमनेरमधील सर्व शिवप्रेमी, युवक, महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवजन्मोत्सव सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा जागर करण्यासाठी तसेच नव्या पिढीपर्यंत स्वराज्याचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालय समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता



सस्नेह निमंत्रण
कुर्यात सदा मंगलम्!!

।। श्री चक्रधर स्वामी प्रसन्न ।।
स.न.वि.वि. आमचे येथे श्री चक्रधर स्वामींच्या कृपेकरून
चि. सार्थक
सौ. मिराबाई व श्री. दत्तात्रेय रामचंद्र गिरी गोसावी
रा. दोडी खु।।, ह.मु. बारागांव पिंप्री, ता. सिन्नर, जि. नाशिक
यांचे द्वितीय चिरंजीव
चि.सौ.कां. पुजा
सौ. संगिता व श्री. युवराज हरिगीर गोसावी
रा. पळसखेडा (मीराचे), ता. जामनेर, जि. जळगांव यांची कन्या
।। शुभविवाह सोहळा ।।
मिती फाल्गुन कृ २ ।। शके १९४७ गुरुवार दि. ५/३/२०२६ रोजी दुपारी ११:५३ वा. या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे.
ऋणानुबंधाची गाठभेट, दोन परिवारांचा आनंदोत्सव, थोरांचे आशीर्वाद, आप्तस्वकियांची उपस्थिती हेच सोहळ्याचे रंग ते आपल्या सानिध्यात साजरे व्हावेत म्हणून हे आग्रहाचे निमंत्रण !
* विवाहस्थळ *
मुक्ताई लॉन्स
बारागांव पिंप्री
निमगांव-सिन्नर
ता. सिन्नर, जि. नाशिक
* टिप *
कृपया पत्रिका हेच मुळ समजून लग्नाला अवश्य यावे, हि विनंती
* हळद समारंभ *
बुधवार दि. ४/०३/२०२६ रोजी सायं. ६.०० वा. विवाहस्थळी
* आपले नम्र *
गं.भा. सिताबाई रामचंद्र गिरी गोसावी (मा. सरपंच, दोडी खु।।)
सौ. मंगलबाई विष्णु श्री. विष्णु रामचंद्र गिरी गोसावी
श्री. जालिंदर रामचंद्र गिरी गोसावी
गं. भा. कलावती रमेश गोसवी
गं.भा. अहिल्याबाई कृष्णा गोसावी
सौ. मिराबाई दत्तात्रेय श्री. दत्तात्रेय रामचंद्रगिरी गोसावी
* निमंत्रक *
श्री. दत्तात्रेय रामचंद्र गिरी गोसावी
श्री. सागर दत्तात्रेय गिरी गोसावी
समस्त गोसावी परिवार व आप्तेष्ट दोडी खुर्द
समस्त ग्रामस्थ व मित्र परिवार बारागांव पिंप्री
मोबा: ९९७०१२१७३५, ९४२१५१०१३५
Omkar Press, SNR : 9689193625



चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

लहान मुलांसाठी कॅशलेस सुविधा उपलब्ध
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
DR. UJWALA JATHAR
Pediatrician & Neonatalogist



अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या

हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
२९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) अॅपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13



दर्शन टेक्सटाईल मार्केट

मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी
सेल नव्हे होलसेल सेल
लेडीज वेअर
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



स्वास्थ्य रक्षणाय रोग परिमार्जनाय
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25